FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I.

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154143

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 35, वर्ष Year 2021 दिनांक Date 16/08/2021

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधि. 1988, कलमे Sections 7

   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........

   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ........, तारीख पासून Date from ऑगस्ट 2020 वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to 02/07/2021 Time ........

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00

   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 23/06/2021, वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 09/21, तारीख Date 16/08/2021 वेळ Time 14:30 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. पुर्वेस 12 कि.मी. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name Monorail कार्यालय वडाळा, मुंबई, No. if any, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name धर्मेश गामी (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name मावजी गामी

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 26 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9819000517

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation फॅसिलिटी मॅनेजमेंट कंपनी

   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता Address : ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........ पॅन नं. PAN No. ........ व्होटर्स नं. Card No. ........ ए' विंग 2002, मिलेनियम ... ठाकूर रोड, ठाकूर कॉम्प्लेक्स

   रस्त्याचे नाव Road कांदिवली (पूर्व) मुंबई - 101, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........

   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडाया.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   (1) डॉ. डि. एल. एन. मुर्ती, चिफ ऑपरेटींग ऑफिसर

   Mumbai Monorail (MMRDA)

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

**जबाब** दिनांक- १६/०८/२०२१

कु. धर्मेश मावोजी गामी, वय २६ वर्षे, व्यवसाय- फॅसीलीटी मॅनेजमेंट कंपनी, रा.ठी. ए विंग २००२ मित निकेतन, ९० फुट रोड, ठाकुर कॉम्पलेक्स, कांदिवली, पुर्व, मुंबई १०१. मो.क्र. ९८१९०००५१७

---

मी वरील प्रमाणे असुन, वर नमुद पत्त्यावर माझे कुटंबीया समवेत रहावयास आहे. माझे मालकीची अॅक्यु सर्व्ह इंटीग्रेटेड फॅसीलीटीज प्रायव्हेट लिमीटेड नावाची कंपनी असुन, तिचे कार्यालय ४१४, ऑपशन्स प्रायमो बिल्डींग,निअर पासपोर्ट ऑफीस, एम.आय.डी.सी. अंधेरी, पुर्व मुंबई-९३ येथे आहे.

आमचे वर नमुद कंपनीला Mumbai Monorail (MMRDA) या प्रकल्पाअंतर्गत साफसफाई, हाउसकिपींग, मेंटनन्स, कस्टमर सर्व्हिस असोशीएट संबधाने, जानेवारी २०१९ ते ऑगस्ट २०२० पर्यतचे कंत्राट मिळालेले होते, त्यानुसार आमचे कंपनीने कंत्राटाप्रमाणे काम पुर्ण केले असुन, सदर कंत्राट ऑगस्ट २०२० रोजी पुर्ण झाले होते, सदर वेळी नमुद कामाचे देयक (बिल/पेमेंट) दोन करोड पन्नास लाख (२.५ करोड) व ३२ लाख बॅक गॅरन्टी असे आमचे कंपनिस मिळणे प्रलंबित होत.

सदर प्रलंबित देयक (बिल/पेमेंट) व बॅक गॅरन्टी रिलीज करणे कामी मी सतत प्रयत्न करीत होतो. त्यासाठीच मी डॉ. डि. एल.एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर (COO), Mumbai Monorail (MMRDA) यांची भेट घेतली असता, त्यावेळी त्यांनी प्रलंबित बिलाचे ७% एकुण १७ लाख रूपये लाचेची मागणी माझेकडे केली होती परंतु त्यावेळी मला त्यांना लाच देण्याची इच्छा नव्हती म्हणुन मी त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नव्हता.

त्यानंतर पाच महिन्या पर्यत माझे कंपनीचे प्रलंबित देयक (बिल/पेमेंट) व बॅक गॅरन्टी न मिळाल्याने, मी वारंवार प्रलंबित देयक (बिल/पेमेंट) व बॅक गॅरन्टी बाबत पाठपुरावा केला होता, परिणामी माहे फेब्रुवारी-मार्च २०२१ मध्ये माझे कंपनीस रूपये २ करोड १० लाखाचे देयक (बिल/पेमेंट) व माहे जुन २०२१ मध्ये २२ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम असे Mumbai Monorail (MMRDA) तर्फे रिलीज (अदा) करण्यात आली होती.

परंतु अदयाप ४० लाख रूपयाचे देयक (बिल/पेमेंट) व ११ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम प्रलंबित असुन, त्यासंबधाने पाठपुरावा केला असता, आधीचे रिलीज केलेल्या बिलाचे तसेच सध्यस्थितीत प्रलंबित देयक (बिल/पेमेंट) व बॅक गॅरन्टीची रक्कम रिलीज करणे कामी, डॉ. डि.एल.एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर (COO), Mumbai Monorail (MMRDA) यांनी पुन्हा नव्याने २० लाख रूपये लाचेची मागणी केली होती, सदर लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने, दिनांक २३/०६/२०२१ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार दणे कामी आलो असता, स.पो.आ. आबासाहेब पाटील व पो.नि. उमेश गौंड यांनी माझी तक्रार ऐकुण घेतली व मला स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार देण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मि त्यांना तक्रार लिहुन दिली. सदर वेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत केल्या जाणाऱ्या कार्यवाहीची मला माहिती देवुण, पडताळणी साठी लोकसेवक डॉ. डि.एल. एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर (COO), Mumbai Monorail (MMRDA) यांची अपॉईन्टमेंट घेणेची मला सुचना दिली.

त्यानंतर मि डॉ. डि.एल.एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर (COO), Mumbai Monorail (MMRDA) यांचे कार्यालयात संपर्क साधुन, दिनांक ३०/०६/२०२१ रोजीची अपॉइन्टमेंट घेतली, व त्याबाबत स.पो.आ. आबासाहेब पाटील व पो. नि. उमेश गौंड यांना अवगत केले असता, त्यांनी दिनांक ३०/०६/२०२१ रोजी सकाळी मला लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात हजर राहण्याबाबत सुचना दिल्या, त्याप्रमाणे मी हजर राहीलो असता, दोन शासकीय पंचाना परचारण करून, त्यांची मला ओळख करून दिली व माझी ओळख त्यांना सांगीतली. त्यानंतर मी दिलेली लेखी तक्रार त्यांना वाचण्यास देवुन, त्यांना सदर तक्रार समजावुण सांगीतली व माझे तक्रार अर्जावर पंचाच्या सहया घेवुण, पो.नि. उमेश गौंड यांनी देखील त्यावर सही केली.

त्यानंतर पो.नि. उमेश गौंड यांनी तांत्रीक शाखेतुन एक डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर, एक पॅकबंद डिजीटल मायक्रो एस.डी. कार्ड व नविन पेन्सील सेल आणुन समोर हजर केले व सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये त्यादिवशी करण्यात येणाऱ्या कारवाईचे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगुन योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. उमेश गौंड यांनी त्यांचे, माझे व पंचाचे पडताळणी कारवाई पुर्वीचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करून घेतले. त्यानंतर आम्ही पथकासह वडाळा मोनोरेल डेपो परिसरात येवुण थांबलो. त्यानंतर मला व पंचाना योग्य त्या सुचनांची उजळणी करून, पो.नि. उमेश गौंड यांनी त्यांचे कडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अश्या पद्धतीने छातीवर

Scanned with CamScanner

अडकवला. त्यानंतर पंच अजित जाधव व पथकातील अंमलदार पो.शि.०३१२०० रावराणे यांचेसह लोकसेवक यांचे त्यांचे कार्यालयात भेटण्या साठी म्हणुन गेलो. परंतु आम्ही लोसेवक यांचे कार्यालयात गेलो त्याच वेळी लोकसेवक त्यांचे वरिष्ठांना भेटणे कामी वरिष्ठ कार्यालयात जात असल्याने त्यांची भेट होउ शकली नाही.

त्यानंतर दिनांक ०२/०७/२०२१ रोजी पुन्हा पडताळणीचे आयोजन करण्यात आले. त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातुन पोलीस पथक पंचासह पडताळणी करीता रवाना झालो व वडाळा मोनोरेल डेपो परिसरात येवुण थांबलो. सदर वेळी पो. नि. उमेश गौंड यांनी पडताळणी संबधाने पुन्हा योग्यत्या सुचना दिल्या व पुन्हा त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे शर्टच्या आतिल बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अश्या पद्धतीने छातीवर अडकवला. त्यानंतर मी पंच अजित जाधव व पथकातील अंमलदार पो.शि.०३१२०० रावराणे यांचेसह लोकसेवक यांचे कार्यालयात भेटण्या साठी गेलो.

सदर वेळी मी लोकसेवक डॉ. डि.एल.एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर (COO), Mumbai Monorail (MMRDA) यांचे दालनात जावुन त्यांची भेट घेतली व माझे कंपनीचे प्रलंबित देयक (बिल/पेमेंट) व बॅक गॅरन्टी बाबत ***" लास्ट टाईम थोडा वो. .. आपने बोला था सर... थोडा स्ट्रेस मे मै काफी चला गया था... बिकॉज आपने एक साथ मे बोल दिया के ट्वेंटी लॅक्स चाहिये करके... आप देखीये सर अगर उसमे... "*** असे कामा संबधाने बोलणे केले होते.

त्यावेळी गैरअर्जदार लोकसेवक डॉ. डि.एल.एन. मुर्ती यांनी समोरून ***" you tell me dharmesh bhai... मेरे को क्या करना है., you tell whatever you want to give you give --- even if you don't give also t will be very happy "*** असे लाच मिळविण्या संबधाने बोलणे करून, लाचेची मागणी केलेली आहे.

तसेच त्यानंतर त्यांनी माझे पेमेंट संबधीत फाईल बाबत अपडेट घेण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी त्यांचे कार्यालयातील अकाउन्टस डिपार्टमेंट मधील कुणाल राहटे यांचे मोबाईल क्रमांकावर संपर्क साधुन, पंचा समक्ष माझे पेमेंट संबधीत फाईल बाबत विचारणा केली असता, त्याने ***सदर फाईल अकाउन्टस् डिपार्टमेंट मधुन क्लिअर होउण, डॉ. डि.एल.एन. मुर्ती यांचे कडे गेली असुन, त्यांना सदर नोटींग फाईलचे मागील पान बदली करावयाचे असल्याने ती त्यांनी त्यांचेकडेच ठेवली असल्याबाबत सांगीतले.***

डॉ. डि.एल.एन. मुर्ती यांनी संगीतले प्रमाणे मी माझे पेमंट फाईल बाबत अपडेट घेवुण त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला परंतु अदयापर्यंत त्यांनी मला अपॉईटमेंट दिलेली नाही. तरी माझे ॲक्यु सर्व्ह इंटीग्रेटेड फॅसीलीटीज प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीला जानेवारी २०१९ ते ऑगस्ट २०२० पर्यत Mumbai Monorail (MMRDA) या प्रकल्पाअंतर्गत मिळालेल्या साफसफाई तसेच हाउसकिपींग चे कामा संबधाने पुर्ण झालेल्या कामाचे याआधीचे प्रलंबित देयक (बिल/पेमेंट) दोन करोड पन्नास लाख (२.५ करोड) व ३२ लाख बॅक गॅरन्टी पैकी रूपये २ करोड १० लाखाचे देयक (बिल/पेमेंट) व २२ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम ही रिलीज (अदा) केल्या बद्दल तसेच सध्यस्थितीत प्रलंबित असलेल्या ४० लाख रूपयाचे देयक (बिल/पेमेंट) व ११ लाख बॅक गॅरन्टीची रक्कम रिलीज (अदा) करणे साठी, डॉ. डि.एल.एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर (COO), Mumbai Monorail (MMRDA) यांनी लाच मिळविण्यासाठी माझे पेमेंटची फाईल स्वत:कडे अडकवुण ठेवुण, २० लाख रूपये लाचेची मागणी करून, लाच मिळविण्या करीता अप्रमाणीकपणे प्रयत्न केले असल्याने त्यांचे विरूद्ध कायदेशीर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझे लोकसेवक डॉ. डि.एल.एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफीसर (COO), Mumbai Monorail (MMRDA) यांचेशी कोणतेही पुर्व वैमनस्य नाही किंवा माझा त्यांचेशी कोणताही आर्थिक देवान घेवानीचा व्यवहार नाही.

माझा जबाब मराठीतुन लॅपटॉपवर टंकलीखीत केला असुन, तो मी वाचुन पाहिला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

(उमेश रमेश गौंड)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

16/08/2021

Scanned with CamScanner

8.) तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... फिर्यादी कडुन

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... २० लाख रुपये

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील "फि" यांचे ब्रॉड्वे सर्व्ह इंटीग्रेटेड फॅसिलीटीज सर्व्हिसेस लिमिटेड या कंपनीला जानेवारी 2019 ते ऑगस्ट 2020 पर्यंत Mumbai Monorail (MMRDA) या प्रकल्पाअंतर्गत मिळालेल्या साफसफाई, हाऊसकिपींग, मेंटनन्स, कस्टमर सर्व्हिस मॅनेजमेंट चे संबधाने पुर्ण झालेल्या कामाचे या अगोदरचे प्रलंबित देयक (बिल/पेमेंट) दोन करोड पन्नास लाख (2.5 करोड) व 32 लाख बँक गॅरंटी पैकी 2 करोड 10 लाखाचे देयक (बिल/पेमेंट) व 22 लाख बँक गॅरंटीची रक्कम हि रिलीज (अदा) केल्याबद्दल तसेच सद्यस्थितीत प्रलंबित असलेल्या 40 लाख रुपयाचे देयक (बिल/पेमेंट) व 11 लाख बँक गॅरंटीची रक्कम हि रिलीज (अदा) करणेसाठी, डॉ. डि. एल. एन. मुर्ती चिफ ऑपरेटींग ऑफिसर (COO) Mumbai Monorail (MMRDA) यांनी लाच मिळविणे साठी 'फि' यांचे पेमेंटची फाईल स्वतःकडे अडकवुन ठेवून, 20 लाख रुपये लाचेची मागणी करुन लाच मिळविण्या करिता अप्रामाणिकपणे प्रयत्न केला म्हणुन भ्र. प्र. अधि. 1988 चे कलम 7 प्रमाणे गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही : उपरोक्त फिर्यादीवरील कलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........

District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name उमेश रमेश गौड

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ..........

Posting ला.प्र.वि. मुंबई

Code No. of I. O. ..........

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant 16/08/2021

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner